# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक

नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २६

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक १७/१०/२०२५ सकाळी ११-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ६. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ७. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ८. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्य अधिकारी |
| ११. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १२. | श्री संजय मोरे | कार्या.अधिक्षक आस्थापना विभाग |
| १३. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता स्थापत्य |
| १४. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| १५. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १६. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १७. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १८. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १९. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २१. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २२. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष अधिकारी |
| २४. | श्री विश्वंभर दासरवाढ | प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ |
| २५. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २६. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २७. | लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २८. | गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-२०२ धुळे मनपा मालकीच्या गाळे, ओटे, कोठे, घरे, जागाभाडेपट्टाधारकांना मनपा ठराव क्र. २२२ व २२३ दि. ११-२-२०१६ नुसार केलेल्या भाडे आकारणीनुसार असलेल्या थकीत भाडे रक्कम वसुलीसाठी २० % सुट देणेची अभय योजना लागू करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा. आयुक्त धुळे मनपाचे सन २०१५-१६ मध्ये जकात उत्पन्न, पारगमन उत्पन्न, जकात व एलबीटी उत्पन्न बंद झाल्याने उत्पन्न वाढीसाठी ठराव क्र. २२२ मनपा मालकीचे गाळे, ओटे, कोठे, याप्रमाणे यांचे जे काही दर होते ते ५० ते ६० वर्षापुर्वीचे दर लावले होते. ते अल्प होतेतसेच उत्पन्न वाढीसाठी दर वाढविणे आवश्यक होते. सन २०११-१२ मध्ये लेखा परिक्षणात देखील कमी दर असल्याने भाडेवाढ करणेबाबत आक्षेप नोंदविले होते. तसेच ठराव क्र. २२३ नुसार मनपाच्या मालकीच्या खोल्या होत्या. वडजाई रोड व गल्ली नं. ५ येथे त्यांना ३ रु. व ५ रु. व ६ रु. प्रमाणे भाडे आकारणी होती. त्यात देखील बदल करणे आवश्यक होते. सन २०१५-१६ च्या दरम्यान रेडीरेकनर दरानुसार आकारणी करावी. तसेच ज्या गाळयांची, दुकानांची मुदत संपली आहे. त्यानुसार त्यांना देयके देण्यात आलेली आहेत. परंतु जे दर होतेजुने व रेडीरेकनर प्रमाणे त्यात फार मोठी तफावत होती. ते साधारणत: ४० ते ५० पट अशा पध्दतीने होते. त्या अनुषंगाने ठराव झाले होते. त्याची जी रक्कम आहे ती ५३ कोटी इतकी आली असुन तसेच शास्ती माफी मा. आयुक्त महाशयांनी स्वेच्छा अधिकारानुसार दिली आहे. त्यास सुध्दा अल्प प्रतिसाद मिळत आहे. हे जर उत्पन्न मनपाला मिळाले नाही तर त्यातुन मनपाचे मोठे नुकसान होणार आहे. तसेच गाळेधारकांचे देखीलनुकसान होत आहे. तसेच सुधारीत करारनामा देखील करता येत नाही. शासन अधिसुचनेनुसार नविन अधिनियम २०२३ याची अंमलबजावणी करता येत नाही. यास्तव सदरचा विषय ७९ (क) प्रमाणे मे. महासभेपुढे सादर केलेला आहे. तसेच यातुन मनपाला फायदे होतील. जसे की, सुधारीत करारनामा होईल. गाळेधारकांकडुन जे डिपॉझिट रक्कम मिळेल, हस्तांतरण फी प्राप्त होईल,भविष्यात जीएसटी कराच्या बाबत थकीत रकमा भरणेसाठी अडचणी येणार नाही, भाडेपटटा धारकांचा मनपावर विश्वास वाढुन उत्पन्न वाढेल, मनपाचा पैसा व वेळ यात बचत होईल. यास्तव मे. महासभेपुढे निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आपणास ठाऊक आहे. मनपाच्या गाळेधारकांचा विषय प्रलंबीत आहे. आपण स्वस्तिक टॉकिज येथील गाळेधारकांचा निर्णय घेतला होता. त्यांनी सर्व थकबाकीची रक्कम भरल्यानंतर आपले मालमत्ता हस्तांतरणाचे जे नियम आहे. सन २०२३ मध्ये नव्याने सुधारणा झालेली आहे. त्याचा आधार घेवुन कमीत कमी १० वर्षे व जास्तीत जास्त ३० वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार कमिटीकडे आहे. आपण १० वर्षेपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. मनपाचे गाळे, कोठे, भाडयाने दिलेल्या खोल्या या सर्वांचा विचार केला साधारण ७०० च्या आसपास येईल. यांची मुदतवाढ व करारनामे संपले आहे. यात कोर्ट केसेस होत्या. लालबहादुर शॉपिंग सेंटरची केस होती. भाजी मार्केट मधील ओटे होते. त्यांचा निकाल परवा झाला. आपण त्यात कॅव्हेट दाखल केली केली आहे. त्यांचे अपिल कोर्टाने फेटाळुन लावले आहे. तसेच राधाकृष्ण शॉपिंग सेंटरमधील गाळेधारक कोर्टात गेले आहेत. जसे आपण प्रॉपर्टी टॅक्सचा रेट ऑफ कॅल्क्युलेशन ३६ टक्के वरुन ३० टक्के वरी आलो आणि तो केल्यानंतर २८ हजारहुन अधिक लोकांनी प्रॉपर्टी टॅक्स भरला आहे. आता त्याच पध्दतीने हे करत असतांना या गाळेधारकांच्या बाबतीत ज्यांचे कोर्ट मॅटर आहे ते सोडुन त्यांच्या बाबतीत आपण निर्णय घेणार नाही. सावता माळी मार्केटआहे. तेथील गाळेधारकांच्या मुदती संपल्या आहे. तेथे आपण रिडेव्हलपमेंट करतोय. या लोकांचा हक्क तेव्हाच राहील जेव्हा त्यांची थकबाकी भरली

जातील. आणि त्याचे मुदतवाढीबाबतचे कमिटीपुढे निर्णय होईल. गाळेधारकांचे मत आहे की, रेडीरेकनरचे दर खुप जास्त आहे. आणि जेव्हा ते रेट लावले तेव्हा त्यात डेप्रिसिएशनचा विचार केला नव्हता. बिल्डींग ५० वर्षे जुनी असेल त्याला नविन बिल्डींगप्रमाणे धरुन रेडीरेकनरचा रेट जसाच्या तसा ठेवुन व्हॅल्युएशन तेव्हा केले गेले होते. सन २०१० पासुनचे ॲरियर आपल्याला घ्यायचे आहे. म्हणुन या साठी गोष्टीचा विचार करुन आपल्याकडे सन २०२३ चे नविन नियम आले त्यामध्ये शैक्षणिक, धर्मदाय व निवासी वापराकरीता ज्या जागा दिल्या आहे. त्याला रेडीरेकनरच्या ०.५ टक्के प्रमाणे त्याचे कॅल्क्युलेशन करावे. अशी स्वरुपाची शासन नियमात तरतुद आहे. तसेच जे व्यापारी व औद्योगिक वापरासाठी दिलेले आहे. त्याचे व्हॅल्युएशन करतांना रेडीरेकनरच्या ०.७ टक्के पेक्षा कमीने अशा पध्दतीने व्हॅल्युएशन करावे. अशा शासनाच्या गाईडलाईन आहे. आपण त्याचा आधार घेतोय. आपण शास्ती माफी योजना यात ऑलरेडी लावलेली आहे. या सगळयांचा विचार करुन रेडीरेकनर कॅल्क्युलेशन आहे. ते लॅण्ड व बिल्डींगला जसेच्या तसे न धरता व त्यात डेप्रिसिएशन धरले नव्हते. या जीआर च्या आधारानुसार ०.७ टक्के नाही पण ०.८ टक्के ने त्याचे कॅल्क्युलेशन करावे. असा आपण निर्णय घेत आहोत. हे व्यापारी व औद्योगिक जागांसाठी राहिल. तसेच जे निवासीच्या खोल्या दिलेल्या आहे. त्यांची देखील मोठी रक्कम आहे व त्यांची मुदतवाढ बऱ्याच वर्षांपासुन केलेली नाही. त्यांच्या बाबतीत आपण ०.७ टक्के ने त्याचे कॅल्क्युलेशन करावे. हे सर्व करतांना ज्या कोर्ट केसेस आहे त्यांच्यासाठी ही मुभा असणार नाही. ते जेव्हा कोर्ट केसेसे विड्रॉ करतील तेव्हा आणि पैसे भरण्यासाठी तयार असतील तेव्हाच त्यांचे कॅल्क्युलेशन करावे. हा मोठा डिसीजन आहे आणि मागील ३-४ बॉडीज च्या काळात हा निर्णय झालेला नव्हता. तसेच सन २०१० पासुन ज्यांची मुदत संपली व करारनामे झालेले नव्हते. जेव्हा सन २०१६ ला ठराव झाला. पुर्वीचे भाडे २० ते २५ रुपये होते. सन २०१६ मध्ये ठराव झाला त्याच्या दुप्पट रेडीरेकनर दराने कॅल्क्युलेशन झालेले होते. खोल्यांना तेव्हा वार्षिक रु. १६२/- भाडे होते व आजच्या दराने रु.१०५५५/- आहे. तसेच ठरावात हे कॅल्क्युलेशन आले पाहिजे. शॉपिंग कॉम्प्लेक्सनिहाय आणि निवासी खोल्यांच्या बाबतीत ०.७ टक्के ने जे कॅल्क्युलेशन होईल ते देखील ठरावात येऊ द्यावे. हे सर्व भरुन ठरावास मान्यता देत आहोत. जेणेकरुन पुढील मुदतवाढ मिळण्याचा मार्ग आहे आणि बाकीचे आपले करारनामे आहेत त्यांचा विषय मार्गी लागेल. जेव्हा सुधारीत करारनामे होतील तेव्हा या लोकांकडुन कुठलीही अनामत आपण घेतली नव्हती पण या ठरावामुळे डिपॉझिट चा मार्ग मोकळा होईल. साधारणत: १० ते १२ कोटीचा रिलिफ लोकांना यातुन मिळेल. त्यांचे करारनामे होतील. मनपाचे उत्पन्न वाढेल. जास्तीत जास्त गाळे, ओटे, कोठे धारकांकडुन हा निर्णय पोहोचेल हे पहावे. आणि हे पैसे भरले जातील यासाठी प्रयत्न करावे. तसेच मनपांच्या खोल्यांच्याबाबत PMAY AHP वाले प्रपोजल किंवा आणखी काही प्रोसेस करता येते का याचा एकदा रिव्हु घ्या. तसेच ८० फुटी रोड येथे मनपाची आरक्षीत जागा पब्लीक सेमी पब्लीकचे आरक्षणवाली या दोन ठिकाणी AHP प्रपोजल प्रोसेस होतात का याचा रिव्हु घ्यावा. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

## धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २०२ दिनांक १७/१०/२०२५

धुळे महानगरपालिका मालकीचे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शॉपिंग सेंटर (विस्तारित) तसेच राधाकृष्णन शॉपिंग सेंटर, बसस्थानक समोरील कै. कि.सो.करनकाळ, पाचकंदिल परिसर तसेच ईतर ठिकाणी असलेले वेगवेगळी संकुले व त्यातील दुकाने, घरे, जागा, ओटे, कोठे धुळे म.न.पा.ने (तत्कालीन नगरपालिकेने) म.न.पा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ नुसार वेळोवेळी मनपा ठरावाने भाडेपट्टयाने दिली होती त्यातील काही संकुलातील भाडेपट्टेधारकांची मुदत सन २०१०, २०१५, २०१६ मध्ये संपलेली आहे

तसेच नपा ठराव क्र. ३८ दि. १३-४-१९९२ अन्वये देखील १० संकुलातील भाडेपट्टाधारकांना ३० वर्ष मुदतीकरीता देण्यांत आली होती त्या भाडेपट्टाधारकांची मुदत दि. १२-४-२०२२ रोजी संपलेली आहे यांना मनपा ठराव क्र. २२२ नुसार आकारणी करून मागणी देयके देण्यांत आली आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासुन ठराव क्र. २२२ व ठराव क्र. २२३ दि. ११-२-२०१६ नुसार मुदत संपलेल्या भाडेपट्टाधारकांना रेडिरेकनर दराची आकारणी करून दरवर्षी मागणी देयके देण्यांत येत आहे. वाचा क्र. २ नुसार प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार एकुण २४ संकुल = ओटे, कोठे, ७६४ जागा, खोल्या = एकुण थकीत रक्कम ५३,३२,५०,२७५/- + शास्ती ८,१२,९५,७८४= शास्ती वजा जाता आज दिनांक १७/१०/२०२५ रोजी सरासरी रक्कम ४५,१९,५४,४९१/- पर्यंत थकीत आहे.

यासंदर्भात सदर थकबाकी वसुल व्हावी यासाठी म. आयुक्त सो. यांचे अधिनियमातील तरतुदीनुसार स्वेच्छा अधिकाराने दि ३१ ऑक्टोंबर २०२५ अखेर १०० % शास्ती माफी सुरू केलेली आहे परंतु त्यास अल्प प्रतिसाद मिळत आहे.

थकीत रकमा वसुल करतांना अडचणी निर्माण होत असुन त्या खालीलप्रमाणे आहेत.:-

**a**. ठराविक मोजकेच गाळेधारकांनी काही प्रमाणांत थकीत रक्कम भरलेली आहे. राधाकृष्ण शॉपिंग सेंटर येथील गाळेधारकांनी वाढीव भाडेदराबाबत मे. धुळे जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला होता त्याचा निकाल म.न.पा. धुळेच्या लाभात झालेला आहे त्याबाबत मे. संभाजी नगर न्यायालयात निकाल प्रलंबीत आहे. पाचकंदिल परिसर व ईतरही भाडेपट्टाधारक वारंवार मे. न्यायालयात दावे दाखल करतात.

**b.** रेडिरेकनर दर भाडेदराची प्रथमत: आकारणी केल्याने रकमेत झालेली वाढ भाडेपट्टेधारक मान्य करत नाही व भरणा करीत नाही तसेच शासनाचे वरिष्ठ कार्यालयाकडे अर्ज / तक्रार करतात.

**c.** दि. २४-२-२०१८ रोजी महानगरपालिकडुन डायरेक्टर जनरल ऑफ सेंट्रल एक्साईज इंटिलिजेंस, नाशिक यांनी मागणी केल्याप्रमाणे सन २०१२-१३ पासुन थकीत सेवाकराची वसुल गाळे भाडे रकमेपोटी दंड व्याजासह रक्कम ७६,८८,२९१/- व एकुण व ईतर विभागांची मिळुन रु. १,०७,४४,९१८/- शासनाकडे जमा करण्यात आले आहे. सदर रक्कम भाडेपट्टेधारकांचे मागणी बिलात वसुली करिता समाविष्ट केली आहे.

**d.** दि. १ जुलै २०१७ पासुन शासन आदेशानुसार सेवाकर ऐवजी वसुल भाडे रकमेवर १८ % GST मिळुन मागणी बिले देण्यांत आली.

**e.** भाडेपट्टेधारकाने देय तारखेस भाडे जमा न केल्याने नियमानुसार शास्ती लावण्यांत आली आहे.

**f.** भाडेपट्टेधारकांचे गाळे मुदत संपली मात्र महानगरपालिकेच्या ताब्यात न दिल्याने मनपा ठराव क्र.२२२ नुसार (दुपटीने) मोठया प्रमाणांत भाडे भरणे भाडेपट्टाधारकांना शक्य होत नाही.

थकीत भाडे रकमा शासन मार्गदर्शक सुचनानुसार सुट दिल्यास अभय योजना लागू केल्यांस संपुर्ण रक्कम भरणेची भाडेपट्टाधारकांनी पत्राद्वारे वेळोवेळी तयारी दर्शविली आहे. महानगरपालिका ठराव क्र. २२२ व २२३ मध्ये सुधारणा करावयाची असेल तर किंवा सुट द्यावयाची असेल तर महानगरपालिकेतील मालमत्तेचा विनियोग संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार मे. महासभेस अधिकार आहे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टेद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टेचे नुतनीकरण) नियम २०२३ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता दिनांक ०७/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने अतिरीक्त मार्गदर्शक सुचना निर्गमीत केलेल्या आहेत. त्यातील सुचना

क्र. (९) मध्ये महानगरपालिकेने भाडेपट्टा थकबाकी वसुलीसाठी अभय योजना हाती घेण्या संदर्भात परीस्थितीनुरुप महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या/ प्रशासकाच्या मान्यतेने संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांनी निर्णय घ्यावा असे नमूद आहे. त्यानुसार महानगरपालिका आर्थिक हिताचे दृष्टीने विषयांकित दिनांक ११/०२/२०१६ नुसार चे ठरावाप्रमाणे आकारणी करून भाडे आकारणीची मागणी देयके दिलेले सर्व भाडेपट्टाधारकांना मागील थकीत रकमेवर किमान २० % सुट / वजावट दिल्यांस धुळे महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळू शकेल. तसेच वरिलप्रमाणे सुट दिल्यांस महानगरपालिकेस खालील फायदे मिळतील.

१.भाडेपट्टाधारकांचे सुधारित करारनामे होईल.

२. भाडेपट्टेधारकांकडून डिपॉझिट रक्कम प्राप्त होईल.

३.भाडेपट्टा हस्तांतर फी मिळेल.

४. भविष्यांत GST कराच्या बाबत थकीत भाडे वरील रकमा भरणेबाबत अडचणी येणार नाही.

५.भाडेपट्टाधारकांचा महानगरपालिकेवरील विश्वास वाढुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

६.धुळे महानगरपालिकेचे न्यायालयीन वेळ, पैसा बचत होईल.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा मालकीच्या गाळे, ओटे, कोटे, घरे, जागाभाडेपट्टाधारकांना मनपा ठराव क्र. २२२ व २२३ दि. ११-२-२०१६ नुसार केलेल्या भाडे आकारणीत मागील थकीत रकमेवर शास्ती व्यतिरिक्त थकीत भाडे रकमेत २० % सुट देणेची अभय योजना लागू करणे बाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा मालकीच्या गाळे, ओटे, कोटे, घरे, जागाभाडेपट्टाधारकांना मनपा ठराव क्र. २२२ व २२३ दि. ११-२-२०१६ नुसार केलेल्या भाडे आकारणीत मागील थकीत रक्कम संबंधित गाळेधारकाने एकरकमी भरल्यास २० % सुट देणेबाबतची **अभय योजनेस** खालील अटी शर्तीवर मान्यता देणेत येत आहे.

१. मनपा मालकीचे गाळे, ओटे, कोठे, जागा, घरे भाडेपट्टे धारकांची मुदत संपलेली आहे व जी प्रकरणे न्यायालयात निकालासाठी प्रलंबीत आहेत अशा भाडेपट्टेधारकांनी न्यायालयीन केसेस मागे घेतलेनंतर थकीत भाडे रकमेवर २० % सुट रकमेचा लाभ देण्यात यावा.

२. मुदत संपलेले भाडेपट्टेधारक मागील व चालु वर्षाचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्व रक्कम एकत्रीत मनपाकडे जमा करुन मुदतवाढ मागणी करतील त्यांची प्रकरणे (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टयाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण) अधिनियम दिनांक ६ नोव्हेंबर २०२३ नुसार भाडे आणि सुरक्षाठेव निर्धारण समितीपुढे निर्णयासाठी सादर करावे.

३. नगररचनाकार यांनी निश्चीत करुन दिलेल्या रेडीरेकनर दराप्रमाणे भाडे व अनामत रकमेसह महानगरपालिकेचे सर्व प्रकारचे कर भरतील त्याच भाडेपट्टेधारकांचे सुधारित करारनामे करण्यात यावे.

४. सुधारीत करारनामे झाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टेद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण)नियम,२०२३ व या बाबतचा शासन निर्णय दिनांक ७ नोव्हेंबर २०२३ मधील शासन निणर्यातील मार्गदर्शक सुचनांनुसार लाभ मिळणेस पात्र समजण्यात यावे.

५. विषयांकीत अभय योजने व्यतिरिक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम (५१) नुसार आयुक्तास असलेल्या आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार वेळोवेळी शास्ती माफी योजना भाडेपट्टाधारकास स्वतंत्रपणे लागू करतील.

६. सदरची विषयांकित अभय योजना ३० नोव्हेंबर २०२५ या कालवधीपर्यंत लागू राहील. मात्र भविषयात मनपा हिताचे दृष्टीने मुदतवाढ देता येईल.

७. सदर ठरावानुसार मागील थकीत रकमेवर या ठरावानुसार देण्यात आलेली २०% सुट रकमेस भविष्यात शासन, मे. न्यायालय आदेश तसेच लेखापरीक्षणातील आक्षेप किंवा इतर कारणाने सदर ठराव रद्द झाल्यास किंवा सुट रकमेची भरपाई देणेस किंवा पुर्तता करुन देणे आवश्यक असल्यास संबंधित सुट घेणारे भाडेपट्टेधारक यांचेकडून त्याप्रमाणे वसुली करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहिल व तो निर्णय भाडेपट्टेधारक व त्यांचे वारसांवर सुध्दा बंधनकारक राहिल.

उक्त अटी शर्तीनुसार धुळे मनपा मालकीच्या गाळे, ओटे, कोठे, घरे, जागाभाडेपट्टाधारकांना मनपा ठराव क्र. २२२ व २२३ दि. ११-२-२०१६ नुसार केलेल्या भाडे आकारणीत थकीत रकमेवर २० % सुट देणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**